अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड




www.surajyadigital.com । शुक्रवार, दि. २४ मे २०२४ । वर्ष : २२ वे ▸ अंक : २३४ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने १२

# अवकाळीने बळीराजा उद्ध्वस्त पंचनाम्याचे आदेश नाहीत!

✔ सुराज्य/ठिकठिकाणच्या वार्ताहाराकडून

**पंढरपूर, कुर्डूवाडी आणि माळशिरस तालुक्यात बुधवारी झालेल्या अवकाळी पावसाने बळीराजा अक्षरश: उद्ध्वस्त झाला आहे. घरावरील पत्रे उडाले असून शेतातील घरांचे मोठे नुकसान झाले. केळीबागा आडव्या झाल्या तर काढणीच्या अवस्थेत असणारे आंबे गळाले. केळीबागांचे नुकसान इतके मोठे आहे की एकही खोड शिल्लक नसल्याचे विदारक चित्र निर्माण झाले आहे. झाडाखाली बांधलेली जनावरे सुदधा झाडे पडून दगावली आहेत. एका बाजूला नुकसान इतके मोठे असताना शासकीय अधिकारी मात्र वरून आदेश आला नसल्याचे सांगत पंचनामे करण्यास असमर्थता दाखवत आहेत. त्यामुळेच आधीच परिस्थितीशी झुंजणाऱ्या बळीराजाची अवस्था 'दुष्काळात तेरावा महिना' अशी झाली आहे.**

## ● केळी बागा आडव्या, आंबे गळाले, जनावरेही दगावली



पाच एकर केळीची बाग वादळी वाऱ्याने भुईसपाट झाली असून उद्ध्वस्त बागेकडे पाहताना केळी उत्पादक शेतकरी राजेंद्र बोडके तर इनसेट : नुकसानीची पाहणी करताना आ.प्रशांत परिचारक...

निमगाव अकलूज, माळेवाडी, खंडाळी वेळापूर मळोली, पिलीव, कुसमोड, कोळेगाव, फळवणी आदी भागांमध्ये केळींच्या बागा भूईसपाट झाल्या. आंबा उत्पादक शेतकऱ्यांचेही मोठे नुकसान झाले असून शेतकऱ्यांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले आहे. घरावरील पत्रे उडून गेले असल्याने अनेकांचे संसार उघड्यावर आले आहेत. ऐन उन्हाळ्यात टँकरद्वारे पाणी देऊन तळहातावरील फोडाप्रमाणे जपलेल्या केळींच्या बागा बुधवारी सायंकाळी आलेल्या जोराच्या वाऱ्यामुळे पोटच्या मुलाप्रमाणे क्षणात उद्ध्वस्त झालेल्या शेतकऱ्यांनी पाहिल्या. बळीराजावर संक्रात आली असून झालेले नुकसान कसे भरून निघणार याची चिंता बळीराजाला सतावत आहे.

अकलूज माळेवाडी येथील राजेंद्र बोडके व सुनील बोडके या दोन्ही बंधूंचे काढणीला आलेली पाच एकर केळींची बाग त्यांच्या डोळ्यादेखत वादळी वाऱ्याने उध्वस्त झाली. हाता तोंडाला आलेली केळींची बाग गेल्याने बोडके कुटुंबीयांवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. पाच ते सात वर्षांमध्ये निमगाव व परिसरामध्ये आंबा फळबागेची मोठ्या प्रमाणात लागवड झालेली असून आंबा काढणीचा हंगाम मध्यावर येऊन ठेपला असताना वादळ वाऱ्याने आंबा बागांचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून आंबा झाडावरील अपरिपक्व फळे वाऱ्याने गळून पडल्याने या ठिकाणच्या शेतकऱ्यांचे देखील लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे या नुकसानीची पाहणी तात्काळ करून त्याचे पंचनामे व्हावेत व नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी आंबा बागायतदारांकडून होत आहे.

पंढरपूर तालुक्यातील अवकाळी पावस व वादळीवाऱ्या मुळे शेतीचे फार नुकसान झाले वादळामुळे संपूर्ण केळीबागांचे प्रचंड मोठे नुकसान झाले आहे. एकही खोड जिवंत राहिलेले नाही, केळींचे हे १००% नुकसान झालेले आहे. आमदार प्रशांत परिचारक यांनी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना धीर देत, प्रशासनाला तात्काळ पंचनामे करून लवकरात लवकर शेतकऱ्यांना मदत करण्याच्या सूचना दिल्या.

घरावरील, शाळेवरील पत्रे वाऱ्यामुळे उडून गेले आहेत यावेळी नुकसानग्रस्त शेतकरी बांधवांशी संवाद साधत, त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या आणि नुकसानाचा आढावा घेतला.यावेळी कैलास खुळे, तानाजी वाघमोडे, संतोष भिंगारे, बाळासाहेब माळी आदी उपस्थित होते. माळशिरस तालुक्यातील पिलीव परीसरात गेल्या पावसाऐवजी वादळी वाऱ्यामुळे फळबागांचे विशेषतः केळी, डाळींब, पपई, द्राक्ष, शेवगा, तसेच बहरात असणाऱ्या आंब्याच्या बागांचे प्रचंड मोठे नुकसान झाले आहे. ऊसाचे, मकेच्या पिकाचे तसेच कडवळ व इतर असणारी पिके जमीनदोस्त झाली. कुसमोड, काळमवाडी, साळमुखवाडी, झिंजेवस्ती, पिलीव, निमगाव, चांदापुरी भागाते प्रचंड मोठे नुकसान झाले आहे. तर कुसमोड भागातील अनेकांच्या घरावरील पत्रे उडून जाऊन संसार अक्षरशः उघडयावर पडले आहेत. झाडाखाली बांधलेली जनावरे सध्दा झाडे पडून दगावली आहेत.

### तुटपुंजी मदत, नुकसानीचे पंचनामे नाहीत

वादळी वाऱ्यामुळे घरावरील पत्रे उडुन गेले आहेत याचे पंचनामे केले आहेत.पण शासनाकडुन यासाठी मिळणारी मदत हि तुटपुंजी असते यामध्ये उडून गेलेल्या पत्र्याची किंमत सुध्दा शासनाकडून मिळत नाही त्यामध्ये शासनाने वाढ करणे आवश्यक आहे तशीच हि मिळणारी मदत वेळेवर सुद्धा मिळत नाही. अशी वाईट अवस्था नैसर्गिक आपत्तीच्या माध्यमातून झालेल्या नुकसानीची आहे. तर पिकांच्या झालेल्या नुकसानीचे मात्र पिलीव परीसरात अद्यापही पंचनामे सध्दा केलेले नाहीत अधिकारी म्हणताहेत आम्हाला वरुनच आदेशच नाहीत.

टँकरने पाणी आणून आम्हा दोघा बंधूंनी केळीची बाग तळ हातावरील फोडाप्रमाणे जोपासली होती परंतु बुधवारी सायंकाळी आलेल्या वादळी वाऱ्याने काढणीला आलेली आमची केळीची पाच एकर बाग पूर्णपणे उध्वस्त झाली असून आमच्या कुटुंबीयांचे १५ लाख रुपयांचे नुकसान झाले आहे तात्काळ याची दखल प्रशासनाने घेऊन पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी.

**- राजेंद्र बोडके, केळी उत्पादक शेतकरी माळेवाडी**

आंबा काढणीचा हंगाम मध्यावर आला असून आंब्याच्या झाडावरील अपरिपक्व फळे जोराच्या वाऱ्यामुळे संपूर्णपणे गळून पडली आहेत यामुळे माझ्या अंबा बागेचे चार लाख रुपयांचे नुकसान झाले आहे बुधवारी सायंकाळी घटना घडून एक दिवस उलटून गेला तरीही पंचनामा करण्याकरिता कोणताही शासकीय अधिकारी आला नाही यामुळे शासन शेतकऱ्यांचे नुकसान गांभीर्याने घेणार आहे की नाही? याची चिंता वाटू लागली आहे पंचनामे करून तात्काळ नुकसान भरपाई मिळावी.

**- सुवर्णा पाटील, निमगाव आंबा उत्पादक शेतकरी**

---

पत्नीस बोलाविण्यास गेल्यावर

## डोक्यात सळई घालून मारहाण

✔ सुराज्य/सोलापूर


पारशी विहिर, नई जिंदगी येथे पत्नीस बोलाविण्यास गेलेल्या धर्मराज परदेशी व त्याच्या भावाच्या डोक्यात सळई घालून मारहाण केल्याप्रकरणी मधुरा धनीवाले, विकी धनीवाले, विनायक म्हेत्रे, पिंकी म्हेत्रे सर्व रा. नईजिंदगी या चौघांविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे.

या प्रकरणी धर्मराज प्रकाश परदेशी वय ३४ रा. पारशी विहीर, नई जिंदगी यांनी एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. यात म्हटले आहे की, दि. १२ मे रोजी १२ वाजण्याच्या सुमारास धर्मराज परदेशी व त्यांचा भाऊ हे दोघे पत्नी रेश्मा हिस बोलविण्यास गेले होते. त्यावेळी वरील चौघांनी परदेशी यांस शिवीगाळ करून हाताने मारहाण केली. यावेळी इतर आरोपींनी, तुम्ही कोण असे विचारल्याचा राग मनात धरून सळईने परदेशी व त्याच्या भावाच्या डोक्यात घालून मारहाण केली. या फिर्यादी वरून वरील चौघांविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे. याचा पुढील तपास हवालदार कटके हे करित आहेत.

---

# उजनीकाठ आक्रोशानं गहिवारला

✔ सुराज्य/टेंभूर्णी, करमाळा



गोकुळ जाधव | कोमल जाधव | शुभम जाधव | माही जाधव | गौरव डोंगरे | अनुराग अवघडे

मृतदेहांना कवळटाळूनचं ते धायमोकलून रडणं... न पाहवणारा तो आक्रोश...फुटणारे हुंदक्यावर हुंदके... बसलेली दातखीळ...डोळ्याचं न खंडणारं पाणी.. हृदय हेलावणारं सगळं ते दृश्य... सगळचं कसं शोकाकूल वातावरण....अन् यामध्येच 'त्या' निष्पाप सहाजणांना दोन वेगळ्या ठिकाणी चितेवर ठेवून दिलेला भडाग्नी...तेव्हा आक्रोशाचा झालेला एकच गलका...उपस्थित सगळ्यांच्या डोळ्यातून दु:ख आश्रूंना झालेली मोकळी वाट...,खूप वाईट झालं..असं घडायला नको होतं...असे अनेकांच्या तोंडातून बाहेर पडलेले शब्द....अन् काहीजण नि:शब्द झालेले...

हे दृश होतं करमाळा तालुक्यातील झरे आणि कुगाव या गावातलं. उजनी जलाशात परवा मंगळवारी सायंकाळी बोट उलटून बुडालेले सहाही मृतदेह आज गुरुवारी पाण्यावर तरंगले. हे मृतदेह आज सकाळी बाहेर काढण्यात आले. करमाळ्याच्या ग्रामीण रुग्णालयात त्यांची उत्तरीय तपासणी करुन अत्यंसंस्कारासाठी हे मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले. बोटींतून प्रवास करातना त्यांच्यावर काळाने झडप घातली. या घटनेच्या पार्श्वभूमीवर, आज अत्यसंस्कारादरम्यान झरे आणि कुगावसह करमाळा तालुक्यावर अक्षरश: शोककळा पसरली. या घटनेनं तालुका दु:ख सागराच्या डोहात अक्षरश: बुडाला. नातेवाईकांचा आक्रोश वातावरण आणखी सुन्न करत होता. गावात अनेकांच्या घरात चुली पेटल्या नाहीत. कोणी.. कोणाचे.. कसे सांत्वन करायचे हाच एक यक्ष प्रश्न होता.

**उजनी काठ दु:खाचा डोंगर :** करमाळा : उजनी धरणाच्या जलाशयामध्ये मंगळवारी बोट उलटून झालेल्या दुर्घटनेत बुडालेल्या सहाजणांचे मृतदेह शोधण्यात आज गुरुवारी सकाळी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाला यश आले. मात्र त्यांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला आहे. आज दुर्घटनेच्या तिसऱ्या दिवशी सकाळपासून बुडालेल्या व्यक्तींचा शोध घेण्याची मोहीम सुरू करण्यात आली होती. ज्या ठिकाणी बोट बुडाली होती, त्या परिसरात आज सकाळी एका पाठोपाठ एक असे पाच मृतदेह आढळून आले. त्यानंतर सहावा मृतदेह सापडला. सहा जणांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला असून आज सकाळी तिसऱ्या दिवशीही उजनी जलाशयाच्या दोन्ही काठावर बुडालेल्या व्यक्तींचे नातेवाईक व ग्रामस्थ बसून होते. आज राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या जवानांना या व्यक्ती आढळून आल्या मात्र त्या मृतावस्थेत. उजनी काठ नातेवाईकांच्या आक्रोशाने पुन्हा गहिवरला.

**वादळी वारा अन् लाटा बेतल्या जीवावर :** २१ मे रोजी सायंकाळी डोंगरे व जाधव कुटुंब इंदापूर तालुक्यातील अजोती येथे पाहुण्याच्या जागरण गोंधळ कार्यक्रमाला निघाले होते. हे सर्व प्रवासी कुगावकडून कळाशीच्या दिशेने जाणाऱ्या बोटेत होते. बोट मध्यभागी नदीपात्रात आल्यानंतर अचानक हलका पाऊस आणि जोरदार वारा सुटला. त्यामुळं रौद्ररुप धारण केलेल्या लाटांचे पाणी बोटीत शिरले आणि बोट जागेवर फिरली. बोटीत पाणी शिरल्यानं ही दुर्घटना घडली आहे. या अत्यंत दुर्दैवी घटनेनंतर परिसरात शोककळा पसरली आहे. या दुर्घटनेत संपूर्ण कुटंबालाच जलसमाधी मिळाली आहे. पती पत्नीसह दोन चिमकल्यांचा यामध्ये समावेश आहे.

**झरेत एकाच चितेवर जन्मदात्या मातापित्यासह चिमुरड्यांवर अंत्यसंस्कार**
जाधव कुंटुबातील वडील गोकुळ जाधव व चिमुकला शुभम गोकुळ जाधव (वय दीड वर्ष) यांना एका रुग्णवाहिकेत तर आई कोमल गोकुळ जाधव (वय २५) व चिमुकली माही गोकुळ जाधव (वय ३, सर्व रा. झरे, ता करमाळा) यांचे मृतदेह दुसऱ्या रुग्णवाहिकेत आणले होते. या चौघांसाठी एकच चिता रचण्यात आली होती. या चौघांना एकाचवेळी भडाग्नी देण्यात आला.

**कुगावमध्ये दोघांवर अत्यंसंस्कार**
कुगावामध्येही अत्यंत शोकाकुल वातावरणात अनुराग ज्ञानदेव अवघडे (वय २८, बोट चालक) आणि आदिनाथ कारखान्याचे माजी अध्यक्ष धनंजय डोंगरे यांचे चिरंजीव गौरव धनंजय डोंगरे (वय २४) यांच्यावर याच गावात मात्र वेगवेगळ्या ठिकाणी अंत्यसंस्कार करण्यात आले.

**करमाळ्यात चार शववाहिका एकदाच सुटल्या अन् हृदय हेलावलं**
उजनी जलशयात बुडून मृत्यूमुखी पडलेल्या सहाजणांचे मृतदेह करमाळ्याच्या ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदनासाठी आणण्यात आले होते. येथील उत्तरीय तपासणी झाल्यानंतर जेव्हा चार शववाहिका एकापाठोपाठ सुटल्या त्यावेळी अक्षरश: उपस्थितांचं हृदय हेलावलं.

**४२ तासांची शोधमोहीम**
उजनी धरणातून मृतदेह शोधण्यासाठी राष्ट्रीय आपत्कालीन प्रतिसाद दलाने ४२ तास मोहीम राबविली. अखेर पहिला मृतदेहाच्या जवळपास अन्य मृतदेह आढळले, अशी माहिती एनडीआरएफचे निरीक्षक सुरेंद्र पुनिया यांनी दिली.

---

बैलगाडा शर्यतीच्या वादातून खून प्रकरण

## गंगाराम गावडे खून खटल्यात आरोपीचा जामीन फेटाळला

✔ **सोलापूर** : खांडेकर वस्ती (ता. सांगोला) येथे बैलगाडा शर्यतीच्या वादातून दि. १५ ऑक्टोबर २०२२ रोजी गंगाराम गावडे यांचा खून करण्यात आला होता. या प्रकरणी आरोपी साहुबा बापू खांडेकर रा. घेरडी याचा जामीन अर्ज अतिरिक्त सत्र न्यायाधीश तोष्णीवाल यांनी फेटाळून लावला.


बैलगाडा शर्यतीत गावडे व खांडेकर यांच्या दोन गटात दि. ९ एप्रिल २०२२ रोजी भांडण झाले होते. दि. १५ ऑक्टोबर २०२२ रोजी गंगाराम गावडे हे कुटूंबियांसह सांगोला येथे डॉ. अलदर यांच्या दवाखान्यात गेले होते. ते घराकडे बोलेरो जीप मधून जात होते. आरोपी सुरेश मुत्यप्पा खांडेकर, सहदेव गौडा लक्ष्मण बंडगर, साहुबा बापू खांडेकर या चौघांनी जीप रस्त्यात आडवी लावून गावडे यांची गाडी अडविली. व त्यांना जीप मधून बाहेर काढून शस्त्रांनी वार करून त्यांचा खून केला. गावडेंचा मुलगा विजय याने फिर्याद दाखल केली.

आरोपी साहुबा खांडेकर याने जामीनासाठी पंढरपूर न्यायालयात अर्ज दाखल केला. अतिरिक्त सत्र न्यायाधीश तोष्णीवाल यांनी आरोपी साहुबा खांडेकर याचा जामीन अर्ज फेटाळून लावला. या खून खटल्यात सरकानच्या वतीने ॲड. सारंग वांगीकर यांनी तर फिर्यादीच्यावतीने ॲड. धनंजय माने, ॲड. जयदीप माने, ॲड. सिध्देश्वर खंडागळे यांनी तर आरोपीच्यावतीने ॲड. गिरीष तपकिरे व ॲड. सतिश लेंडवे यांनी काम पाहिले.

---

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



या वर्षी उन्हाळा खूप जास्तच आहे !

| कल्याण |
| --- |
| 136-02-589 |

| मुंबई |
| --- |
| 270-97-368 |

---

# अखेर 'तो' दिसला

▸ निसर्गप्रेमींचा आनंद गगनात मावेना
▸ नान्नज अभियारण्य परिक्षेत्रात निसर्ग पशु-पक्षी गणना
▸ बुद्धपोर्णिमेनिमित्त वन विभाग, पर्यावरणप्रेमींकडून निसर्गानुभव कार्यक्रम

✔ सुराज्य/सोलापूर

**त्याच्याबद्दल आपरुप तरी किती? 'तो' दिसावा याच्यासाठी किती अट्टाहास. अक्षरक्ष: रात्र डोळ्यात तेल घालून काढलेली. त्याचं ते रुपडं दिसावं यासाठी निसर्गाकडं पर्यायानं ईश्वराकडं हातही जोडलेले. 'तो' कुठे असेल ? कुठे दिसेल? त्याचं अस्तित्व तर असेल ना? असे एकानाअनेक प्रश्न मनात घोळत असताना निसर्गानुभव घेण्याची मोहीम सुरु असलेली. पण शेवटी 'तो' दिसला. 'याची देही, याची डोळा' पाहण्यसाठीची जी आतुरता होती. ती संपली. 'तो' दिसण्यानं निसर्गानुभव घेण्याचं सार्थक झालं. त्याला डोळ्यात सामावून घेतलं...जणू तो डोळ्यासमोर कधीच जाऊ नये...यासाठीच.**

होय, तोच तो अत्यंत दूर्मिळ 'माळढोक'. ज्याला पाहण्यासाठी त्यापेक्षाही त्याचं अस्तितत्व नान्नज माळढोक अभारण्य परिक्षेत्रात आहे का याबद्दल जाणून घेण्यासाठीची आस पूर्ण झाल्याचं समाधान करुन देणारी ती घटना.

पुणे वन्यजीव विभागामार्फत बौद्ध पोर्णिमेनिमित्त निसर्गानुभ व कार्यक्रमाचं आयोजन विविध ठिकाणी करण्यात आलं होतं. सोलापूर जिल्ह्यात नान्नज माळढोक परिक्षेत्रातही याचं आयोजन करण्यात आलं होतं. या मोहिमेत वन विभागाचे अधिकारी तसेच कर्मचारी यांच्यासह निसर्गप्रेमी सहभागी झाले होते. या निसर्गानुभव





कार्यक्रमांत रात्रीवेळीच्या वेळी पक्षी, प्राणी यांचा शोध घेऊन गणना करण्यात आली. यावेळी नान्नज अभारण्य परिक्षेत्र परिसरात सर्वांच्या आकर्षणाचा आणि कुतुहलाचा विषय असलेला माळढोक पक्षी दिसलस. काही निसर्गप्रेमींनी तो याचि देही याची डोळा पाहिला.

### 'हे' आढळले पशु-पक्षी

चिंकारा, तरस, खोकड, रानडुक्कर, लांडगा,ससा, रानमांजर, कोल्हा, मोर,वटवाघूळ, टिटवी, घुबड आदी.

### मागील वेळी 'तो' दिसला एकटाच

यापूर्वी वनविभाग आणि निसर्गप्रेमी यांच्यावतीने नान्नज अभारण्य परिक्षेत्रासह अन्य ठिकाणी निसर्गाच्या सानिध्यामधील पशू-पक्षांची गणना केली होती, त्यावेळीदेखील एक मादा प्रजातीचा माळढोक दिसला होता.तोच आताही दिसला असावा असा अंदाज वन विभाग आणि निसर्गप्रेमींनी लावला.